**महाराष्ट्र शासन**

सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, रविंद्र नाट्य मंदिर, २ रा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.

## - विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धा-

मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिनस्त असणाऱ्या महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रात ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे.

विश्वकोश मंडळाच्या https://marathivishwakosh.org/ या संकेतस्थळावर विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेच्या नोंदणीचा दुवा (लिंक) दि. ११/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी स्पर्धा नोंदणीची मुदत दि. २५/१/२०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये शाळा नोंदणी, समन्वयक नोंदणी व विद्यार्थी नोंदणी केवळ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या https://marathivishwakosh.org/ या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने करता येईल. स्पर्धेबाबतचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे :

**विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धा :** संपूर्ण महाराष्ट्रातील इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता सदरची स्पर्धा ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे.

स्पर्धेबाबतच्या सविस्तर माहितीसाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या https://marathivishwakosh.org/ या अधिकृत संकेतस्थळाला कृपया भेट द्यावी.

(डॉ. शामकांत बा. देवरे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.